**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**जाहिरातीचा मसुदा**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या आस्थापनेवरील 'कीटकनियंत्रण अधिकारी'वर्ग(ब) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली 2 रिक्त पदे भरण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्ज स्विकारण्याचा दिनांक :- 16/07/2020 अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :- 11/08/2020**

**पदाचे नांव/वर्ग :- कीटकनियंत्रण अधिकारी (वर्ग – ब) एकूण रिक्त पदे - 02**

**तक्ता अ – आरक्षण /अनुशेष**

| | **अजा** | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | **साआशैमा** | आदुघ | खुला | **एकूण** | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 2 | कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते बृहन्मुंबई महापालिका, एफ/ दक्षिण विभाग कार्यालय,3 रा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ,मुंबई-400 012 |
| एकूण | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 2 | |

**अर्हता, वयोमर्यादा आणि वेतनश्रेणी :**

**अ) शैक्षणिक अर्हता**

1) उमेदवार कीटकशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवीधारक असावा.(M.Sc.-Entomology).

**उपरोक्त शैक्षणिक अर्हतेचे उमेदवार न मिळाल्यास,**

प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यापैकी एक विषय घेऊन मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विज्ञानाचा पदवीधारक असावा.(B.Sc-Zoology OR Chemistry OR Micro Biology)

कीटकशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवीधारक (MSC-Entomology) उमेदवाराचा नियुक्तीसाठी प्रथम विचार करण्यात येईल. त्यानंतर ज्या उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कीटकशास्त्र या विशेष विषयासह प्राणीशास्त्राची पदव्युत्तर पदवी आहे किंवा ज्याने नॅशनल इंन्स्टीट्युट ऑफ कम्युनिकेबल डिसिझेस,दिल्ली किंवा तत्सम संस्थेतून मलेरिऑलॉजी किंवा कीटक शास्त्राचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल

2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांचा मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.

3) उमेदवार डी.ओ.इ.ए.सी.सी. सोसायटीचे 'सी.सी.सी.'किंवा'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर'स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.ई.सी.टी'चे प्रमाणपत्र धारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास,त्याने/तिने शासनाने विहित केलेले'एम.एस.सी.आय.टी' ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 2 वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**ब) वयोमर्यादा :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत नसल्यास, उमेदवाराचे वय दि.16/07/2020 रोजी 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत 43 वर्षे)

माजी सैनिक।ना सेवेमधे वयोमर्यादा सवलत शासन निदेशानुसार प्रकरण परत्वे लागु करण्यात येईल.

**क) वेतनश्रेणी :- रु.38600-122800/-**

**ड) निवडीचे निकष व कार्यपध्दती -**

**कीटकशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवीधारक(MSc Entomology)उमेदवारांचा नियुक्तीसाठी प्रथम विचार करण्यात येईल उपरोक्त शैक्षणिक अर्हतेचे उमेदवार न मिळाल्यास,**ज्या उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कीटकशास्त्र या विशेष विषयासह प्राणीशास्त्राची पदव्युत्तर पदवी(Msc Zoology)आहे किंवा ज्याने नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ कम्युनिकेबल डिसिजेस, दिल्ली किंवा तत्सम संस्थेतून मलेरिऑलॉजी किंवा कीटकशास्त्राचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

उपरोक्त शैक्षणिक अर्हतेचेही उमेदवार उपलब्ध न झाल्यास, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र किंवा सुक्ष्मजीवशास्त्र यापैकी 1 विषय घेऊन 75% व त्यापेक्षा अधिक गुणांसह विज्ञानाचा पदवीधारक असलेल्या'अजा'व'साआशै'प्रवर्गातील उमेदवारांचा नियुक्ती साठी विचार करण्यात येईल.

सदर पदाकरिता मंजूरीप्राप्त निवडीच्या निकषानुसार,खालीलप्रमाणे प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार स्वतंत्ररित्या गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

| **अ.क्र** | **निवडीच्या निकषाचा तपशील** | **गुणांचा तपशील** |
|---|---|---|
| 1 | M.Sc.(Entomology)/ M.Sc.(Zoology) with special subject Entomology/ B.Sc(Zoology/ Chemistry/Microbilogy) सदर पदव्युत्तर पदवी/पदवी परिक्षेच्या अंतिम वर्षात प्राप्त केलेल्या एकूण गुणांपैकी 70% प्रमाणे गुण विचारात घेण्यात येतील | 70 |
| 2 | लेखी परिक्षा | 30 |
| | **एकूण गुण** | **100** |

सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार, विहित केलेली अर्हता व अटी धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची एकूण 30 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.(त्यापैकी 10 गुण विषयाशी संबंधित(Technicial),10 गुण बुध्दीमत्ता चाचणी (Aptitude Test) व 10 गुण सामान्य ज्ञान(General Knowledge) याकरीता असतील.) सदर लेखी परिक्षेत उत्तीर्ण होण्यास विषयांसंबंधीत किमान 4 गुण, बुध्दीमत्ता चाचणीमधे 4 गुण व सामान्य ज्ञानामधे 4 गुण असे एकूण 12 गुण प्राप्त होणे आवश्यक आहे.

पदव्युत्तर पदवी/पदवी परिक्षेच्या अंतिम वर्षामधे प्राप्त केलेल्या अंतिम गुणांपैकी सरासरी 70% प्रमाणे गुण विचारात घेण्यात येतील व त्यानुसार पदव्युत्तर पदवी/पदवी परिक्षेतील सरासरी 70% प्रमाणे गुण + लेखी परिक्षेतील 30 पैकी प्राप्त केलेले गुण यांच्याआधारे उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार स्वतंत्ररित्या गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील(Merit List) उमेदवारांपैकी रिक्त पदाच्या गुणोत्तरानुसार(1 पदास 3 उमेदवार याप्रमाणे) पात्र उमेदवारांची विहित आरक्षणानुसार निवड यादी तयार करण्यात येईल.

समान गुण धारण करणा-या अर्हताधारक उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

**इ) <u>लेखी परिक्षेकरीता तारीख,ठिकाण व वेळ उमेदवारांना नोंदणीकृत पत्राद्वारे तसेच ईमेलद्वारे कळविण्यात येईल.</u>**

**<u>सर्वसाधारण अटी :</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनूसार नेमणूका करण्यात येतील. तथापि, निवडयादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या व अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व विहित दिनांकानंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमुद केलेल्या पदाकरीता अर्ज करावयाचा असेल तर, त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखाच्या ना-हरकत प्रमाणपत्रासह विहित मुदतीत अर्ज करणे आवश्यक आहे.
5. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमुद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या 4 अतिरिक्त प्रती पुढील निवडप्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.
6. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे(छायांकीत प्रतीसाठी वापरण्यात येणा-या)लिगल आकारातील असावे.
7. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पुर्ण करतात, उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
8. **पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.**
9. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.
10. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/अधिवास प्रमाणपत्र,शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, व्यावसायिक अर्हता,संबंधित गुणपत्रिका,असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र यांच्या साक्षांकीत झेरॉक्स प्रतीं अर्जासोबत सादर कराव्यात. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र,नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहीत महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. उमेदवार एकापेक्षा अधिक प्रयत्नात अंतिम वर्षाची पदवी/ पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण झाला असल्यास सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.अन्यथा त्या उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

11. **उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.**

12. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल,किंवा तशा अर्थाचे(आशयाचे) बंधपत्र(Surety Bond) सादर करावे लागेल. सदर सुरक्षित अनामत रक्कम भरुनसुध्दा मनपामधे नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास, त्यांना जमा केलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

13. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

14. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.

15. रिक्त पदांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेतील गुणवत्तेनुसार कपात यादी तयार करण्यात येऊन, त्यानुसार उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलविण्याचा अधिकार महानगर पालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

16. उमेदवारांना लेखी परिक्षेकरीता नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

17. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य असेल.

18. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

19. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

20. **साआशैमा प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नविनतम प्रमाणपत्र (नॉनक्रिमिलिअर प्रमाणपत्र) नियुक्तीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहिल.**

21. **निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियम,1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा वर्तणूक नियम,1999 लागू होतील. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम(1953)आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधि योजना लागू होणार नाही.**

22. **सदर भरतीअंतर्गत नियुक्ती 3 वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व 3 वर्षांनंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबुन असेल.**

23. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवाराची सबंधित पदावर नेमणूक केली जाईल.

24. उमेदवार नोकरी करीत असल्यास ,पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करावे.

25. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.

26. परिपत्रक क्र.एमबीसी/7100 दि.31/01/2012 च्या सोबतच्या महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/2011/प्रक्र/1064/11/16 ब दि.12/12/2011 नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्याचे वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून 6 महिन्याच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

27. निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षाकरिता किंवा नवीन भरती प्रक्रीयेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यत, या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यत विधीग्राहय ठरेल त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

28. शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.581A/16-ब दि.4/7/2019 व परिपत्रक क्र.एमबीसी/4584 दि.2/8/2019 नुसार सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाकरिता13% आरक्षण लागू करण्यात येईल.

29. **<u>अर्ज सादर करण्याची पध्दत</u> :-**

पात्रता निकषांची पुर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी टपालाद्वारे किंवा वैयक्तिकरित्या पाठविणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

**<u>विशेष सूचना</u> :**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठक/ मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
5. सेवायोजन कार्यालये/ प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतींसह सादर करणे आवश्यक आहे.

**सही /-**
**डॉ.(श्रीम)मंगला गोमारे**
**कार्यकारी आरोग्य अधिकारी (प्र)**

## बृहन्मुंबई महानगरपालिका
## अर्जाचा नमुना

पदाचे नाव :- कीटकनियंत्रण अधिकारी (ही माहिती अर्जाच्या लिफाफ्यावरही लिहिणे आवश्यक आहे.)

प्रति,

कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामधे वर नमूद केलेल्या पदाकरीता दि..............च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

1. (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :-.............................................................................
   (ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव :-.............................................................................
   (क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव(महिलांकरिता):-.............................................................................
2. (अ) पत्ता :-.............................................................................
   .............................................................................
   (ब) भ्रमणध्वनी क्रमांक :-....................................ईमेल क्र....................................
3. लिंग :- पुरुष : स्त्री :
4. (अ) जात......................पोटजात........................प्रवर्ग................................
   (ब) नॉनक्रिमिलिअर प्रमाणपत्र : आहे / नाही..........क्रमांक......................
   (क)जात प्रमाणपत्र : आहे /नाही
   (ड) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही..........क्रमांक......................
5. जन्मदिनांक : दिनांक ☐☐ महिना ☐☐ वर्ष ☐☐☐☐
   दि................रोजी असलेले वय.............वर्षे..............महिने.............दिवस
6. शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | उत्तीर्णतेचे प्रयत्न | टक्केवारी | एस.एस.सी / एच.एस.सी परिक्षेतील मराठी विषयातील गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | | मराठी विषयातील प्राप्त गुण | पैकी |
| एस.एस.सी | | | | | | | 100 |
| एच.एस.सी(सायन्स) | | | | | | | 100 |
| बी.एस्सी | | | | | | | |
| एम.एस्सी(कीटकशास्त्र) | | | | | | | |

7. संगणकविषयक ज्ञान : एम.एस.सी.आय.टी किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र
   :- आहे/नाही ............गुण............
8. अनुभव :- :.............................................................................
9. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता :.............................................................................
10. सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास
    त्याचा क्रमांक व दिनांक, नुतणीकरणाचा दिनांक.............................................................................
11. (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? :-.............................................................................
    (ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा
    व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी :-...............................................
12. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का
    असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा :-.............................................................................
13. सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का ?असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन,
    सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे :-.............................................................................
    उंची..........फूट.......इंच........वजन.........किलोग्रॅम, .शरिराची ठेवण : किरकोळ/मध्यम/सुदृढ,
    वर्ण........नेत्रवर्ण........ वैयक्तिक खुण...............................

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करते की, वरील माहिती जाणिवपूर्णक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामूळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास, किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशील कारवाई करु शकते याची मला जाणिव आहे.

सोबत : 1) आपला/आपली विश्वासू
2)

दिनांक : अर्जदाराची सही/-

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)